## युनिट 4

### 2) माहीतीचा अधिकार

प्र. 1 ला. माहिती अधिकार अधिनियम 2005 चे वर्णन करा ? ( 8 मार्क )

उ. :– लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असते. आणि प्रतिनिधिक लोकशाहीत प्रतिनिधी जनतेचा जबाबदार असावे. असे म्हटले जाते. परंतु आज जनप्रतिनिधी खरोखरच आपल्या जबाबदारीचे पालन करतात का ? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला नकारार्थी दयावी लागते. तेव्हा जनप्रतिनिधीला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा एक प्रभावी मार्ग म्हणजे माहितीचा अधिकार होय. नागरीकांना शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरणामुळे असलेली माहिती मिळवण्याचा अधिकार असणे. हे निकोप लोकशाहीचे एक आवश्यक तत्व समजले जाते. आणि हीच गोष्ट लक्षात घेऊन लोकांच्या दबावातून 2005 मध्ये माहितीचा अधिकार केंद्राने जनतेला दिला. माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या सर्व विभागाना माहिती गोळा करून जनतेला दयावी लागते. त्यामुळे शासन प्रशासनातील नाकरर्तेपणा, भ्रष्टाचार याला आळा बसला आहे. व शासनातील सर्व संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता येणार आहे. म्हणुन माहितीचा अधिकार हा अधिनियम ऐताहासीक दृष्टया अतिशय महत्त्वाचा ठरतो. जनतेच्या सार्वभौमत्वाचा अविष्कार या अधिकारांद्वारे दिसुन येतात. त्यामुळे जनतेचे सार्वभौमत्व व श्रेष्ठत्व कायम राखण्यास मदत झाली. या अधिकारांमुळे नेतेमंडळी व नोकरशाहाच्या भ्रष्टाचाराला आळा बसुन जनतेचे श्रेष्ठतव प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे. माहितीचा अधिकार सर्वप्रथम सिडने मध्ये 1976 ला नागरीकांसाठी मंजूर झाला. विसाव्या शतकात मानवो हक्काची सर्वत्र चर्चा चालू असताना 10 डिंसेबर 1948 रोजी प्रस्तुत झालेल्या मानवी हक्काच्या जाहिर नाम्यात कलम 19 मध्ये प्रत्येकाला माहिती मिळण्याचा अधिकार आहे. असे स्पष्ट नमूद केले आहे.

माहितीचा अधिकार हा मानवी हक्काचा एक भाग आहे. असेच त्याबदद्ल म्हटल्या गेले आहे. जगामध्ये मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर जगातल्या अनेक राष्ट्रानी आपल्या देशातील नागरीकांसाठी माहीतीचा अधिकार लागू केला. भारतामध्ये देखील हा अधिकार मुलभूत अधिकारातील स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या माध्यमातून जे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नागरीकांना दिले आहे. त्याचा संबंध थेट माहितीच्या अधिकांराशी येतो. असा निर्वाळा वेळोवेळी न्यायालयाने घेतला होतो. तसे पाहिले तर स्वातंत्र्य पूर्वीच्या प्राप्तीच्या काळापासुन या अधिकारांच्या मागणीसाठी वेळोवेळी इंग्रजाकडे अर्ज करत होते. तेव्हा 1923 मध्ये जनतेने इंग्रजी सरकार कडून माहीती मागण्याचा अधिकार असावा असा जो अर्ज केला होता **official secreat act** तो अर्ज म्हणजेच माहीती मागण्या बद्दलची अभिलाषा भारतामध्ये

स्वातंत्र्याप्राप्ती पूर्वीच्या काळापासुनच होती असे म्हणावे लागते. आणि इंग्रजानी केलेला **official secreat act** स्वातंत्र्याप्राप्ती नंतर देखील भारतात कायम ठेवण्यात आला. म्हणुन माहितीच्या अधिकारांची मागणी करण्यात आली. विसाव्या शतकाच्या अखेरीस देशातील अनेक समाजसुधारक व विचारवंतांकडून माहीतीचा अधिकार मिळण्यासाठी अनेक आंदोलने आली .

1992 मध्ये विभागीय आयुक्त अधिकारांनी सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि रोजगार समायोजन कार्याची सर्व कागदपत्रे जनतेसाठी खुली केली . यानंतरही अनेक लोकांनी माहीतीच्या अधिकारांच्या दृष्टीकोनातून अनेक चळवळी उभारल्या. या चळवळी अंतर्गत  महाराष्ट्रात अण्णा हजारे यांनी माहीतीच्या अधिकारासाठी फार मोठे आंदोलन उभारले. याची परीणीती म्हणजे 2002–2003 मध्ये माहीतीचा अधिकार महाराष्ट्रासाठी मंजूर केला गेला परंतु पुढे 2005 मध्ये केंद्रसरकारने संपूर्ण देशासाठी माहीती अधिकार अधिनियम 2005 लागू केल्याने महाराष्ट्रासाठीचा हा अधिनियम ठरला.

माहिती अधिकारांचे महत्त्व आणि भूमीका

1) सुशासन :–

भारतीय लोकशाहीत माहीती अधिकाराची भूमीका व महत्त्व खालील मुद्याच्या आधारे सांगता येईल. सुशासनाची निर्मीती होण्यास मदत माहीती अधिकारामुळे भ्रष्टाचाराला आळा बसुन शासकीय कार्यात पारदर्शकता आली आहे. त्यामुळे सुशासन निर्माण होण्यास मदत झाली आहे.

2) जनतेचे श्रेष्ठतव प्रस्थापित करण्यास मदत :–

या अधिकाराच्या माध्यमातून माहीती मागण्याचा अधिकार जनतेला प्राप्त झाल्यामुळे प्रशासकीय कामासंबंधीची कोणतीही माहीती जनता मागू शकते. व ते माहीती पुरवणे, संबंधित खात्याचे व अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यास हा अधिकार उपयोगाचा ठरला आहे.

3) ई– गर्व्हन्सची स्थापना :–

भारतीय जनतेला प्रशासकीय कार्याची माहीती लवकर प्राप्त व्हावी यासाठी ई–गर्व्हन्सची स्थापना करण्यात आली .

ई– गर्व्हन्सच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न होत आह. त्यामुळे लोक आता जागृत होऊन काणत्याही अनैतीक कार्याला बळी न पडता कार्य करीत आहे. म्हणुन हा अधिकार ई– गर्व्हन्सची स्थापना करण्यासाठी उपयोगाचा ठरला आहे

4) भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत :–

शासन प्रशासनाची संपूर्ण माहीती प्रशासकीय अधिकाऱ्याला या अधिकारांच्या माध्यमातून जनतेला दयावी लागत असल्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली आहे.

5) व्यक्तीच्या स्वातंत्र्याशी संबंधित :–

या अधिकाराचा संबंध व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी जोडण्यात आल्यामुळे या अधिकाराची उपयोगिता वाढलेली आहे.

6) सामाजिक कल्याण :–

जनतेचे जास्तीत–जास्त कल्याण करणे हा कल्याणकारी राज्याचा उद्देश असतो. आणि जनतेला जास्तीत–जास्त सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा अधिकार उपयोगाचा ठरतो. म्हणुन हा अधिकार महत्वाचा आहे.

घटनात्मक अधिकार :–

या अधिकाराला घटनात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. माहीती अधिकाराअंतर्गत माहिती अधिकार अधिनियम 2005 यामध्ये या अधिकाराला समाविष्ट करण्यात आले . या अधिकारांअंतर्गत प्रत्येक व्यक्तीला प्रशासनातील कोणतीही माहीती प्राप्त करता येते. व ही माहीती अधिकाऱ्याला विशिष्ट कालावधीच्या आत दयावी लागते. अशी माहीती देण्यास तो टाळाटळ करत असेलतर त्याच्या कार्यवाहीसाठी आयुक्त उपयोगाकडे अर्ज करता येतो. त्यामुळे या अधिकाराला घटनात्मक अधिकाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

❖ जनतेत जागृती करण्याकरीता व जनतेच्या हिताकरीता आवश्यक :–

जनतेचे प्रश्न व समस्या सोडवीण्यासाठी प्रशासनातील भ्रष्टाचार व अनैतिक आचरण टाळण्यासाठी हा अधिकार महत्वाचा ठरतो. म्हणुन याची उपयोगिता आहे.

1) जनतेत जागृती करण्यासाठी :–

या अधिकारामुळे आपल्यावर होणारे अन्याय व अधिकार याबद्दल जनतेच्या मनात जागृकतेची भावना निर्माण झाली आहे. व आपल्या अधिकारांसाठी व अन्यायासाठी आपण संघर्ष केला पाहीजे. ही भावना जनतेत निर्माण झाली आहे.

2) या अधिकारामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ होऊन माहीती मागितल्यानंतर ती त्वरीत पुरविणे, त्याबद्दलचे पुरावे देणे ही कामे कर्मचाऱ्याकडून त्वरीत केल्या जात असल्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ घेऊन कर्मचाऱ्याचो प्रतिमा उंचावण्यासाठी मदत झाली

3) सर्व सामान्य जनतेचे समाधान या अधिकारांमुळे होते. :–

माहीतीच्या अधिकारांमुळे सामान्य नागरीक जनतेकडे कोणती ही माहीती मागू शकतो. एखाद्या सरकारी कर्मचारी योग्य मार्गाने जात नसेल, पण त्याला प्रश्न विचारून माहीती मागून त्याच्या कार्यात गतिमानता आणता येते. त्यामुळे या कायदयाने सर्वसामान्य नागरीकांना दिलासा मिळाला आहे.

4) जनता व प्रशासन याच्यात सलोखा :—

या अधिकारामुळे जनता व प्रशासन यांच्यात सलोखा प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे. या अधिकारामुळे प्रशासन तत्परतेने काम करते. व जनतेच्या समस्या विशिष्ट कालावधीत सोडवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे लोकशाही यशस्वी होण्यासाठी तसेच शासनाच्या यशस्वीसाठी शासन आणि जनता या दोन्ही वर्गासाठी माहीती चा अधिकार उपयोगी व कल्याणकारी ठरला आहे.

माहीती मागण्याची पद्धती

माहीती अधिकार अधिनियम 2005 नुसार एखाद्या विषयासंबंधी माहिती मिळवायची असेल तर संबंधित विभागाच्या जन माहीती विभागाच्या अधिकाऱ्याकडे विविध नमुन्यात अर्ज करावा लागतो. त्यावर दहा रूपयाचा कोर्ट फीस स्टम्प लावला जातो. आणि काही दस्तऐवज त्याच्या प्रती मागायच्या असल्यास त्यासाठी संबंधित विभागाने आकारलेली फी दयावी लागते. माहीती रजिस्टर पोस्टाने मागीतली असल्यास त्याचा खर्च दयावा लागतो. तसेच संबंधित विभागाकडे आपण अर्ज केल्याच्या 30 दिवसाच्या आत आपल्याला ती माहिती मिळाली पाहिजे. व मिळाली नसल्यास 30 दिवसाच्या आत अपील अर्ज करता येतो. अपील अर्ज केल्यानंतरही माहिती मिळत नसेल किंवा चुकीची व दिशाभूल करणारी मिळत असेल तर 90 दिवसाच्या आत राज्य माहीती आयोगाकडे अपील करता येते. राज्य माहीती आयोग आयुक्ताकडे अपील करता येते आणि राज्य अशी चूकोची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याबाबत शिक्षा किंवा तुरूंग वास तसेच त्या विरूद्ध विभागीय चौकशीचे आदेश देखील देऊ शकते.

माहिती देण्याबाबत चूक झाली असल्यास संबंधित माहिती अधिकाराला आर्थिक दंड देवू शकते वरील माहीतीचा अधिकार कोणत्या प्राधिकरणा कडे आपण बजावू शकतो याबाबत माहीती अधिकार अधिनियम 2005 मध्ये सांगीतले आहे. केंद्र आणि राज्यशासनाच्या कायदयाद्वारे किंवा घटनेद्वारे घटीत व शासनाच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या तसेच शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या वित्त पुरवठा केल्या जातो. अशा सार्वजनिक संस्थांचा समावेश माहीती प्राधिकरणामध्ये होतो. या कायदयाच्या प्रकरण दोन मध्ये एकुण नऊ

कलमे दिली असुन कलम तीन नुसार माहीतीचा अधिकार देण्यात आला असुन कलम 4 मध्ये सार्वजनिक प्राधिकरणावरील असलेल्या आबंधनाचा तपशील दिला आहे. कलम 5 मध्ये जन माहीती अधिकाऱ्याना कसे पदावर आणले जाईल यासंबंधीची तरतुद आहे. तर कलम 6 मध्ये माहीती मिळविण्याची प्रकिया दिली आहे. तर कलम 8 मध्ये कोणत्या प्रकारची माहीती देता येत नाही . याबाबतच्या अपवादाची यादी दिलेली आहे. जसे देशाचे सार्वभौमत्व , एकात्मता, सुरक्षेततेला बाधा पोहचत असेल, न्यायालयाने जी माहीती देण्यासाठी मनाई केली असेल, ज्या माहोतीमुळे संसद आणि राज्यविधीमंडळ सदस्याचा विशेषाधिकारांचा भंग होत असेल, पण जी माहीती सार्वजनिक हितासाठी बांधक असेल, अशा बाबीची माहीती देण्यात येणार नाही . अशी तरतुद आहे. कलम 9 मध्ये विशिष्ट प्रकरणात माहीती देण्यास नकार देण्याची कारणे देखील आहेत. तर 10 व्या कलमात ज्या प्रकरणात माहीती देता येत नाही  परंतु त्या प्रकरणातील असा एखादा भाग गोपनीय ठेवण्याची गरज नाही तो त्या माहीती पासुन अलग करून माहीती मागणाऱ्याला उपलब्ध करून देता येते. तसेच कलम 11 नुसार त्रयस्थ पक्षाची माहीती देण्याची प्रकिया देखील दिली आहे. भारतामध्ये माहीतीच्या अधिकारांची योग्य अमलंबजावणी व्हावी यासाठी कलम 12, 13, 14 नुसार केंद्रिय माहीती आयोग राहील, तर कलम 15 नुसार एक राज्य माहीती आयोग राहील, असे नमुद करण्यात आले आहे.

- केंद्रिय माहीती आयोग :– ( 8 मार्क )

माहीती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 12 नुसार केंद्रसरकार केंद्रामध्ये एक केंद्रिय माहीती आयोग स्थापन करेल असे सांगण्यात आले आहे.

रचना :–

केंद्रिय माहीती आयोगात एक प्रमुख राहील व आवश्यकतेनुसार 10 परंतु 10 पेक्षा जास्त नकोत इतके केंद्रिय माहीती आयुक्त असते. केंद्रिय माहीती आयोगाचे संचालन, व्यवस्थापन आणि अधीक्षण मुख्य माहीती आयुक्त करेल, आणि इतर माहीती आयुक्त त्याला साहय करतील, केंद्रिय माहीती आयोग स्वतंत्रपणे आपल्या अधिकारांचा वापर करेल.

नियुक्ती :–

केंद्रिय माहीती आयोगाचा मुख्य माहीती आयुक्त व इतर सदस्य याची नियुक्ती राष्ट्रपती एका त्रीसदस्य समोतोच्या शिफारशीनुसार करतील. या समीतीमध्ये पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्ष नेता, पंतप्रधानानी नेमलेला एक कॅबिनेट मंत्री असेल.

कायदा, विज्ञान, समाजसेवा :– व्यवस्थापन, पत्रकारीता, शासन व प्रशासनाच, व्यापक अनुभव असलेल्या व्यक्तींना केंद्रिय माहीती आयुक्त पदावर नियुक्त करता येईल. व या नियुक्ती नंतर संसद किंवा राज्य विधीमंडळातील सदस्य त्यांना राहता येणार नाही, तसेच शासनातील आर्थिक लाभाचे पद धारण करता येणार नाही.

कार्यकाल :–

या सदस्यांचा कार्यकाल 5 वर्ष असेल, पण वयाची 65 वर्ष पूर्ण होईपर्यंत ते आपल्या पदावर राहतील. कार्यकाल संपल्यानंतर त्याना पुन्हा नियुक्त करता येणार नाही. माहीती आयुक्त स्वच्छेने आपला राजीनामा राष्ट्रपतीकडे सोपवू शकतात.

मुख्य माहीती आयुक्त व माहीती आयुक्त यांना निवडणुक आयुक्तप्रमाणे वेतन व भत्ते दिले जातील त्यांच्या सेवाशर्ती मुख्य निवडणुक आयोगाप्रमाणे असतील.

पदावरून काढण्याची पद्धती :–

गैरवर्तन अंःक्षमता इत्यादी कारणावरून राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुख्य माहीती आयुक्त व इतर माहीती आयुक्तांना पदमुक्त करू शकतात. याशिवाय नैतिक अधःपतन, नादांरो, भ्रष्टाचार, शारीरिक मानसीक, विकलांगता ई. कारणावरून राष्ट्रपती माहीती आयुक्ताना पदावरून काढू शकतात.

राज्य माहीती आयोग :—

कलम 15 नुसार प्रत्येक राज्यासाठी एक राज्य माहीती आयोग राहील, असे देखील नमूद करण्यात आले आहे.

रचना :—

राज्य माहीती आयोगाचा एक मुख्य आयुक्त आणि 10 परंतु 10 पेक्षा जास्त नको इतके राज्य माहीती आयुक्त असते. राज्य माहीती आयोगाचे संचालन, व्यवस्थापन, अधीक्षण मुख्य माहीती आयुक्त करतील व इतर आयुक्त मदत करतील. राज्य माहीती आयुक्त देखील आपल्या अधिकारक्षेत्रात स्वतंत्रपणे आपल्या अधिकारांचा वापर करतील, कायदा, विज्ञान, समाजसेवा, पत्रकारीता, व्यवस्थापन, शासन प्रशासनाचे व्यापक ज्ञान, व अनुभव असलेल्या प्रसीद्ध व्यक्ती मधून राज्य माहीती आयुक्त व इतर सदस्य नियुक्त केले जाते. नियुक्ती नंतर राज्य माहीती आयुक्तांना संसद किंवा राज्यविधीमंडळाचे सदस्य राहता येणार व लाभाचे आर्थिक पद धारण करता येणार नाही.

कार्यकाल :—

या आयोगाच्या सदस्याचा कार्यकाल 5 वर्षांचा असतो. पण वयाच्या 65 वर्षा पर्यंत ते पदावर राहू शकतात. कार्यकाल संपल्यानंतर त्याला पुर्ननियुक्त करता येणार नाही. तसेच स्वच्छेने आपला राजीनामा राज्यपालाकडे पाठवतील. किंवा अकार्यक्षमता, गैरवर्तन, भ्रष्टाचार, या कारणावरून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यपाल त्यांना पदावरून काढू शकतात.

नियुक्ती :—

राज्य माहीतीच्या आयोगाच्या मुख्य आयुक्ताची व इतर आयुक्तांची नियुक्ती राज्यपाल एका त्रीसदस्य समीतोच्या मतानुसार करेल. या त्रीसदस्य समीतीचा अध्यक्ष असेल, व विरोधी पक्ष नेता व मुख्यमंत्री म्हणेल तो एक कॅबिनेट दर्जाचा राज्यमंत्रीमडळाचा मंत्री हे सदस्य असतील

माहीती आयोगाचे अधिकार व कार्ये " :—

1) अधिनियमाच्या तरतुदीच्या अधिग्राहय पुढील व्यक्तीकडून तकार स्वीकारणे,त्याची चौकशी करणे, केंद्रिय व राज्य माहीती आयोगाचे मुख्य काम आहे.

2) माहीती अधिकारी नियुक्त केला नसेल आणि अपीलीय अधिकाऱ्याने अर्ज स्वीकारण्यास नकार दिला असेल अशा व्यक्तीच्या तकारी माहीती देण्यात ज्यांनी नकार दिला आहे. अशा व्यक्तींच्या तकारी स्वीकारणे

3) विशिष्ट मुदतीत प्रतीसाद मिळाला नसेल, अशा व्यक्तीच्या तकारी, अवाजवी फी भरण्यास ज्यांना भाग पाडण्यात आले आहे. अशा व्यक्तीच्या तकारी एखादया प्रकरणात खोटी माहीती दिली आहे असे वाटल्यास अशा व्यक्तींच्या तकारी एखादया प्रकरणात चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत असे वाटल्यास राज्य माहीती आयोग चौकशी करते.

4) कोणत्याही बाबीची चौकशी करण्यास माहीती आयोगाला दिवाणी. न्यायालयाचे अधिकार असतात. याच्या संदर्भात अपील दाखल करण्यात आले आहे. त्यांना किंवा त्रयस्त पक्षांना वाजवी संधी देणे आयोगाचे काम असते.

5) अपीलीय कार्यवाही मध्ये विनंती नाकारणे योग्य होते. हे सिद्ध करण्याची जबाबदारी अपीलीय अधिकाऱ्यांची असते.

6) माहीती आयोगाने दिलेले निर्णय संबंधित पक्षांना बंधनकारक असते.

7) केंद्रिय जनमाहीती अधिकारी व राज्य  जनमाहीती अधिकार राज्य माहीती आयोगाला आहे. तसेच अधिनियमातील तरतूदीच पालन करणे, सुचना करणे, व प्रशिक्षणाची व्यवस्था करणे हे आयोगाचे कार्य आहे.

8) केंद्रिय व राज्य माहीती आयोग तकारींवर निर्णय देताना त्या संबंधिची सर्वांगीण चौकशी करू शकते.

भारतीय लोकशाहीत माहीती अधिकारांची भूमीका –

पूर्वी शासन प्रशासनातील काही माहीती संसद व राज्यविधीमंडळाचे सदस्यच मागत होते, परंतु आता हा अधिकार सर्वसामान्य व्यक्तींनाही प्राप्त आहे. त्यामुळे लोकशाहीत खऱ्या अर्थाने जनतेचे श्रेष्ठत्व प्रस्थापित झाले आहे. भ्रष्टाचाराला आळा घालणे, शासन प्रशासन कार्यात पारदर्शकता आणणे, राज्यकर्ते, अधिकारी, व कर्मचारी यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे अधिकारांमुळे शक्य झाले आहे. तसेच माहीती देण्याचे बंधन अधिकाऱ्यावर असल्यामुळे शासन प्रशासन कामाची गुणवत्ता वाढणार आहे. यामुळे जनतेच्या सक्रीयेत वाढ होऊन, शासन, प्रशासनात जनतेचा सहभाग वाढणार आहे. त्यामुळे शासन प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी जनतेप्रती जबाबदार धरले जाणार आहे. व शासन प्रशासन अधिक लोकाभिमुख होणार असुन त्याचा फायदा लोकशाहीची प्रभावी अमलंबजावणो करण्यासाठी होणार आहे.

---

# 73 आणि 74 वी घटना दुरूस्ती

प्र. 1 ला. जिल्हा परीषदेची रचना, अधिकार, कार्य आणि भूमीकेचे वर्णन करा ?

( 16 मार्क )

उत्तर :– पंचायत राज व्यवस्थेतील सर्वोच्च संस्था म्हणुन जिल्हा पातळीवरील जिल्हा परीषदेची संस्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक राज्यात महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समीती अधिनियम 1961 नुसार प्रत्येक जिल्हयात जिल्हा परीषद स्थापन करण्यात आली. याची रचना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

रचना :–

1) सभासद संख्या :–

जिल्हा परीषदेतील एकुण सदस्याची संख्या 50 ते 75 च्या जवळपास असते. जिल्हा परीषदेत कमीत कमी 50 व जास्तीत जास्त 75 सदस्य असावे असे सांगितले जाते.

2) निवडणुक :–

जिल्हा परीषद सदस्याची निवडणुक प्रत्यक्ष मतदानाने जिल्हयात राहणाऱ्या लोकांकडून प्रौढ मताधिकार व गुप्त मतदान पद्धतीने होते. साधारणतः 40, हजार लोकसंख्येला एक प्रतिनीधी असे प्रमाण निश्चित केले जाते. यामध्ये अनुसूचित जाती–जमाती, व स्त्रीयांसाठी काही राखीव जागा ठेवल्या जातात स्त्रियासाठी या राखीव जागा 50 % इतके असतात.

3) कार्यकाल :–

जिल्हा परीषद सदस्याचा कार्यकाल हा 5 वर्षांचा असतो. जिल्हा परीषद अकार्यक्षमरीत्या कार्य करीत असेल तर मुदतीपूर्व विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार जिल्हा परीषद बरखास्त केली जाते.

4) पदाधिकारी :–

जिल्हा परीषदेचा एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतो. जिल्हा परीषदेचे सदस्य आपल्यामधून एकाची अध्यक्ष म्हणुन बहुमताने निवड करतात. तर त्याचवेळेस अध्यक्षाच्या अनुउपस्थितीत जिल्हा परीषदेचा कार्यकाल पाहण्यासाठी एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड केली जाते.

5) कार्यकाल :-

त्यांच्या`कार्यकाल हा 5 वर्षांचा असतो. अध्यक्षांचे पद अनुसूचित जाती – जमाती व स्त्रियासाठी रोटेशनने ( **Rotesion** ) राखीव ठेवले जाते. पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्याच्या अगोदर अविश्वासाचा ठराव मांडून जिल्हा परीषद अध्यक्षाला अध्यक्षाला पदमुक्त करता येते. किंवा तो स्वच्छेने आपला राजीनामा विभागीय आयुक्तांकडे पाठवू शकतो. महाराष्ट्र शासनाने जिल्हा परीषद अध्यक्षाला मंत्र्याचा दर्जा दिला आहे त्याला नियमानुसार वेतन भत्ते मिळतात. निवासासाठी शासकीय निवास स्थान असते.

अध्यक्षाची कार्य :-

जिल्हा परीषदेच्या बैठकी बोलवणे, बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषविणे, सभेचे कामकाज चालविणे, जिल्हा परीषदेचे विविध कागदपत्रे पाहणे, जिल्हा परीषदेच्या सामान्य व वित्तीय प्रशासनावर देखरेख ठेवणे. आणि विविध कामाना मंजूरी देणे. स्थायी समीतीने मंजूर केलेल्या ठरावाची अमंलबजावणी होते की नाही ते पाहणे. संकटकाळी लोकहीत लक्षात घेऊन नविन कामे चालू करणे सुरू असलेली कामे आर्थिक स्थितीमुळे बंद करणे जिल्हा निधीचा लोकहितासाठी वापर करणे. जिल्हा परीषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे त्याच्याकडून प्रशासकीय कामाची माहीती घेणे व प्रशासकीय समन्वय कायम ठेवणे, जिल्हा परीषदेच्या अध्यक्षाच्या अनुउपस्थितीत उपाध्यक्ष जिल्हा परीषदेची ही सर्व कामे पार पाडते.

जिल्हा परीषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी –जिल्हा परीषदेच्या प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी शासनद्वारा नियुक्त करण्यात येतो. तो शासनाचा प्रतिनीधी असुन लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेत उर्त्तीण झाल्यानंतर नियुक्त केला जातो. त्याचा कार्यकाल  शासनाच्या इच्छेवर अवलंबून असतो. शासनाला वाटल्यास त्याची बदली दुसऱ्या जिल्हा परीषदेत किंवा राज्याबाहेर कोठेही सरकार करू शकते. असे जरी असले तरी जिल्हा परीषद सदस्य 2/3 बहुमताने त्याला पदावरून काढू शकतात. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मदतीला काही उपमुख्य अधिकारी देखील नियुक्त केले जाते.

जिल्हा परीषदेचे कार्य :-

जिल्हा परीषद आपले कार्य समित्याच्या माध्यमातून पार पाडत असते. त्या दृष्टीने जिल्हा परीषदेच्या खालील समित्या तयार करण्यात आल्या आहेत.

1) स्थायी समिती 2) कृषी व सहकार समिती 3) समाजकल्याण समिती 4) शिक्षण समिती 5) आरोग्य समिती 6) सार्वजनिक बांधकाम समिती 7) वित्त समिती

1) स्थायी समिती :–

स्थायी समितीमध्ये कमीत कमी 7 व जास्तीत जास्त 11 सदस्य असतात. जिल्हा परीषदेची ही सर्वांत महत्त्वाची समिती आहे. जिल्हा परीषधेचा अध्यक्ष समीतीचा अध्यक्ष असतो. आणि उपमुख्य कार्यकारी समितीचा सचिव असतो. जिल्हा परीषद स्वीकृत करून घेतलेल्या दोन सहयागी सदस्यांचा समावेश या समीतीत होतो. या समितीच्या संमतीशिवाय जिल्हा परीषदेचे काम होऊ शकत नाही. धोरण निर्मिती आणि इतर समित्यावर नियंत्रण हे या स्थायी समितीचे मुख्य कार्य असते.

2) कृषी व सहकार समिती :–

शेती विकासाच्या बाबतीत निर्णय घेणे. व विकासाच्या वेगवेगळया योजना राबवणे. यासाठी ही समीती कार्यरत असते. यात एक अध्यक्ष व इतर 16 सदस्य असतात. 16 पैकी 9 निर्वाचित व 5 सहयोगी सभासद असतात. व दोन शेती व सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतात.

3) समाजकल्याण समिती :–

समाजातील मागासवर्गीय दुर्बल, अल्पसंख्याक लोकांच्या कल्याणासाठी ही समिती निर्माण केली जाते. या समीतीत जिल्हा परीषदेच्या सदस्यातून निवडलेले 8 सदस्य असतात. त्यापैकी पाच अनुसूचीत जाती–जमाती व 3 सभासद सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गातील असावे लागतात. याशिवाय 2 स्त्री सभासद घ्यावे लागतात. समितीचा अध्यक्ष हा अनुसूचीत जाती–जमातीचा असावा, असे बंधन आहे. जिल्हा परीषद समाजकल्याण अधिकारी हा या समीतीचा पदसिद्ध अधिकारी असतो. अनुसूचीत जाती–जमातीचा विकास करणे स्त्रिया अपंग, विधवा, परीत्यक्ता दुर्बल घटकांचा विकास करणे. आर्थिक मदत देणे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे त्यांना मार्गदर्शन देणे, समाज मंदीर उभारणे आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे. इ. कामे या समीतीला करावी लागतात.

4) शिक्षण :–

या समितीत जिल्हा परीषदेत निवडून आलेले 7 सदस्य असतात. याशिवाय शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या 2 व्यक्ती सहयोगी सदस्य म्हणुन नियुक्त केल्या जातात. जिल्हा परीषद

शिक्षणाधिकारी हे या समीतीचे पदसिद्ध सभासद असतात. निर्वाचित सभासदांमधून एक अध्यक्ष निवडला जातो. ग्रामीण भागात प्राथमीक आणि माध्यमीक शिक्षणाची सोय करणे. शैक्षणिक साधन–सामुग्री उपलब्ध करून देणे वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवणे, शिक्षकांची भर्ती करणे इ.

6) सार्वजनिक बांधकाम समिती :–

ग्रामीण क्षेत्रात शासकीय इमारती उभारणे. रस्त्याची सोय करणे, तळे उभारणे, छोटे पाटबंधारे इत्यादी. कामासाठी ही समिती असते. यात एक अध्यक्ष व 7 निर्वाचित व तीन सहयोगी सदस्य असतात.

7) वित्त समिती :–

जिल्हा परीषदेचे आर्थिक नियोजन व वित्तीय कामासाठी ही समिती असते. या समितीत एक अध्यक्ष 8 निर्वाचित सदस्य व चार आर्थिक क्षेत्रातील तज्ञ असे सहयोगी सभासद असतात.

8) आरोग्य समिती :– ग्रामीण जनतेच्या आरोग्य सर्वधनासाठी व त्यांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही समिती कार्य करते. ग्रामीण दवाखान्यांची सोय करणे , औषधी  व इतर आरोग्य विषयक साधन सामुग्री पंरवणे , प्रतिबंधक उपाया अंर्तगत लसीकरण, औषधीकरण ,कुटंब कल्याण , माता –बाल संगोपन, आरोग्य शिक्षण इत्यादी कामे करणे .यात जिल्हा परिषधेचे सात निर्वाचित सदस्य व 4 स्वीकृत सभासद असतात. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी याचा पदसिद्ध सभासद असतो. व समिती चा एक अध्यक्ष असतो.

जिल्हा परीषदेचे अधिकार आणि कार्य :–

निरनिराळया समित्याच्या माध्यमातून जिल्हा परीषद खालील कार्य पार पाडत असते.

1) शेतीविषयक कार्य :–

संपूर्ण जिल्हयातील शेतीचा विकास करणे व व्यवस्था पाहण्याची जबाबदारी जिल्हा परीषदेवर असते. त्या अनुशंगाने शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतीचा विकास करणे शेतकऱ्यासाठी मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आयोजित करणे, शेतकरी मेळावे भरविणे शेतकऱ्याच्या शेतीतील उत्पन्न वाढविणे. यासाठी निरनिराळया उपाययोजना करणे.

2) पशुसंर्वधन :—

पशुसंर्वधनाच्या कार्यामध्ये जनावरांसाठी दवाखाने, कृत्रिम रेतन केंद्रे बांधणे, साथीच्या रोगापासुन जनावरांचे संरक्षण, करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे, गुरांचे प्रदर्शन भरविणे, कोंबडया, शेंळया मेंढया व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे, जास्त दुध देणाऱ्या जनावरांची पैदास करणे. शेतकऱ्यांना जनावराच्या आरोग्याविषयीची माहीती पुरविणे इत्यादी कामे जिल्हा परीषदेला करावी लागतात.

3) वनक्षेत्रात वाढ आणि वृक्ष लागवडीचे कार्य :—

जिल्हयातील पडीक जमीन वनीकरणासाठी उपयोगात आणणे शक्य तिथे वृक्ष लागवड करणे, वृक्षाचे संर्वधन करणे. लोकांना सामाजिक वनीकरणाचे महत्व पटवून देणे. जनावरासाठी कुरणे तयार करणे. प्रदुषण कमी करण्याऱ्या योजना राबवणे. इत्यादी कामे जिल्हा परीषदेला करावी लागतात.

4) शिक्षणविषयक कार्य :—

ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची संपूर्ण अमंलबजावणीचे कार्य जिल्हा परीषदेला करावी लागतात. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी जिल्हा परीषदेत नियुक्त केल्या जातो. या शिक्षण विषयक कार्यात प्राथमिक व माध्यमिक स्तरांतील शिक्षणाचा प्रसार करणे, इमारती बांधणे, शाळाना अनुदान देणे, शैक्षणिक साहीत्य व अन्य सामुग्री पुरविणे, शाळाची तपासणी करून गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करणे, शिक्षकांच्या नेमणुका करणे व नेमणुकीला मान्यता देणे शिक्षकांची बदली बढती इत्यादी . विषयी निर्णय घेणे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे व मोफत शिक्षण सुरू करणे बालवाडया अंगनवाडया, प्रौढ शिक्षण चालविणे आदिवासी साठी शाळा काढणे.

5) वैद्यकीय व आरोग्यविषयक कार्य :—

ग्रामीण भागात दवाखाने उभारणे, उपचारगृहे, वसतीगृहे, यांची उभारणी करणे, वैद्यकीय मदतीसाठी अर्थसाह्य देणे, वैधकीय कर्मचाऱ्याची भर्ती करणे त्याच्यावर देखरेख ठेवणे, स्वास्थ कायम ठेवण्याच्या दृष्टीकोनातून गलिच्छ वस्त्याची सुधारणा करणे, सायीच्या रोगाचे निर्मूलन करणे, लसीकरण फीरते दवाखाने, साफ—सफाई, आरोग्य—सेवक, औषधीचा पुरवठा

कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन, सकस आहार पुरविणे इत्यादी कामे जिल्हा परीषदेला करावी लागतात.

6) समाजकल्याण :–

ग्रामीण भागातील जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये कल्याणकारी योजना राबवण्याची जबाबदारी जिल्हा परीषदेची असते. यासाठी मागासलेल्या जाती–जमाती, वृद्ध, मागास वर्गीय समाजातील महिला व दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी योजना राबविणे बसतीगृह बांधणे. आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे व असा विवाह करणाऱ्या जोडप्याला आर्थिक मदत देणे, अंधश्रद्धा निर्मूलन आणि आर्थिक विकासासाठी प्रयत्न करणे इत्यादी कामे जिल्हा परीषदेला करावी लागतात.

7) समाजकल्याण घडवून आणणे :–

समाज शिक्षणाचे कार्य जिल्हा परीषदेकडून केले जाते. या कार्याअंतर्गत ग्रामीण भागातील जनतेसाठी वेगवेगळया क्षेत्रातील घटना आणि घडामोडीच्या बाबतीतील माहीती चित्रपट दाखविण, प्रदर्शन घडविणे, पत्रके लावणे, लोकनाट्य–पथनाट्य या माध्यमातून लोकांचे समाजशिक्षण घडवणे.

8) सहकारविषयक कार्य :–

जिल्हा परीषदेच्या सहकारविषयक कार्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी जिल्हा परीषदेची असते. जिल्हायातील सहकारी सोसायट्या, सहकारी बॅंका, खरेदी–विक्री संघ, सहकारी संस्थांना राज्य सरकारच्या योजना समजावणे. सहकारी संस्थाच्या वाढीला प्रोत्साहन देणे, त्यांना आर्थिक विकासाच्या संदर्भात मार्गदर्शन करणे, इत्यादी कामे जिल्हा परीषदेला करावी लागतात.

9) इमारती व दळणवळण :–

तालुका पंचायतीचे रस्ते जिल्हा रस्त्यांना जोडणे, पुल बांधणे ग्रामीण भागातील शासकीय इमारती बांधणे रस्ते तयार करणे, लहान पाटबंधारे योजना राबविणे, ग्रामीण शौचालय ,नदयाचे घाट व तलाव बांधण इत्यादी कामे जिल्हा परीषदेकडे सोपवली जातात.

10) ग्रामीण गृह निर्माण :–

जिल्हयाच्या क्षेत्रात बाजार, धर्मशाळा, ग्रामपंचायत कार्यालय आरोग्य भवन, समाज मंदिरे चावडया, यांचे बांधकाम करणे, बेघरांसाठी मोफत घरे बांधून देणे, आदर्श गांव व ग्रामीण पुर्नरवसनाची जबाबदारी जिल्हा परीषदेवर असते. यासाठी पुरेशी आर्थिक तरतुद करणे, याशिवाय जिल्हयाच्या क्षे्त्रातील यात्रा, धार्मीक व सामाजिक समारोह याची व्यवस्था पाहण्याचे काम देखील जिल्हा परीषदेला करावे लागते.

जिल्हा परीषद करापासुन मिळणारे उत्पन्न व शासकीय अनुदानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशातून ही सर्व कामे पार पाडत असते.

- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्य :–

  जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला खालील प्रकारची कार्य पार पाडावी लागतात.

  जिल्हा परीषदेच्या बैठकांना उपस्थित राहणे, जिल्हा परीषदेबाबत अहवाल शासनाकडे पाठविणे जिल्हा परीषदेचा अर्थसंकल्प सादर करणे, करांची वसुली करणे, जिल्हा परीषदेच्या संपूर्ण प्रशासनावर नियंत्रण ठेवणे जिल्हयाच्या विकासाच्या योजना आखणे, जिल्हा परीषदेच्या तृतीय व चुतूर्थ कमंचाऱ्याची भर्ती करणे अध्यक्षाच्या समंतीने वेळ प्रसंगी जिल्हा परीषदेची बैठक बोलविणे जिल्हा परीषद कर्मचाऱ्याच्या बदली बढती संबंधी निर्णय घेणे. राज्य–शासनाच्या प्रतिनिधी म्हणुन कार्य करणे.

---